ePaper

# मुंबई महापालिकेसाठी शिंदे-फडणवीसांची मोठी खेळी

वर्ष - 6 । अंक - 219 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 22 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




**आतील पानांत**

- शिवराय सर्वांसाठी कायमच आदर्श!;फडणवीस यांची स्पष्टोक्ती
- 'इंडस्ट्रिअल अँड रेसिडेंसिअल कॉरीडॉर' होणार वाहतूक कोंडी मुक्त
- सनदशीर, लोकशाही मार्गाने मार्गाने सीमाप्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध


### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'कोर्टात' खासदार श्रीरंग बारणे यांचे पारडे जड

# अतिरिक्त आयुक्तपदी सुनिल थोरवे!

### आयुक्त शेखर सिंह यांनी बसविला मर्जीतील अधिकारी

**।पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



राज्यातील सत्तेत बदल झाल्यानंतर महापालिका प्रशासनातील बदल्यांचा धडाका सुरू आहे. महापलिका अतिरिक्त आयुक्त- ३ पदावर सुनिल थोरवे यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमध्ये शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांची शिफारस असल्याची चर्चा आहे. त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांवर पदोन्नतीमध्ये अन्याय होतो आहे का? असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.

महापालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांना पदोन्नतीद्वारे अतिरिक्त आयुक्त-३ या पदावर संधी द्यावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यासाठी नगर सचिव विभागाचे सहआयुक्त उल्हास जगताप यांच्या नावाची शिफारस लांडगे यांनी केली होती. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खासदार श्रीरंग बारणे यांचे पारडे जड ठरले. त्याद्वारे सुनिल थोरवे यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला.

पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त- ३ या पदाचे कामकाज नगरविकास विभागाचे सहआयुक्त उल्हास जगताप यांच्याकडे अनेक दिवसांपासून सोपवले होते. या पदासाठी अपेक्षीत अनुभव आणि शैक्षणिक आर्हता असतानाही महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या पदावर सुनिल थोरवे यांची नियुक्ती झाल्याचे आदेश काढले. त्यामुळे महापालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. पालिकेतील एकही अधिकारी निकष पूर्ण करत नसल्याचे पालिका प्रशासनाने राज्य शासनाला कळविले होते. त्यानुसार राज्य शासनाने पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी सुनिल थोरवे यांची नियुक्ती केली आहे.

#### नवीन आकृतीबंधानुसार महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे

**महापालिकेच्या आकृतिबंधाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. नवीन आकृतीबंधानुसार महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण झाली आहेत. त्यातील दोन अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तवरचे आणि महापालिका अधिका-यांकरिता पदोन्नतीसाठी एक याप्रमाणे तीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत राज्य सेवेतील जितेंद्र वाघ आणि प्रदिप जांभळे महापालिकेत कार्यरत आहेत. तर, स्थानिक अधिका-यांसाठी असलेल्या तिस-या अतिरिक्त आयुक्तांचा प्रभारी पदभार नगरसचिव उल्हास जगताप यांच्याकडे 18 फेब्रुवारी 2021 रोजी दिला होता.**

#### बारणे-लांडगे यांच्यात समन्वयाचा अभाव?

**वास्तविक, या पदावर महापालिका अस्थापनेवरील अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी भाजपाचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. तसेच, उल्हास जगताप यांची आर्हता असून, त्यांना नियुक्ती मिळावी. यासाठी मागणी केल्याचेही महापालिका अधिकाऱ्यांमध्ये चर्चा आहे. मात्र, खासदार श्रीरंग बारणे यांच्या मदतीने सुनिल थोरवे यांनी 'सातारा कनेक्शन' चा वापर करीत अतिरिक्त आयुक्त- ३ पदावर संधी मिळवली. महापालिका आयुक्तपदी शेखर सिंह आणि आता अतिरिक्त आयुक्तपदी सुनिल थोरवे यांच्या नियुक्तीमध्ये खासदार बारणे यांचा 'रोल' निर्णायक असल्याने महापालिका प्रशासकीय यंत्रणेवर बारणेंचा वचक वाढल्याचे दिसत आहे. दुसरीकडे,** बदली आणि नियुक्तींमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे बारणे आणि लांडगे यांच्यात नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

#### आयुक्तांनी बसविला मर्जीतील अधिकारी

**राज्य सेवेतील दोन अतिरिक्त आयुक्त पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रतिनियुक्तीवर कार्यरत असताना आता तिसरे अतिरिक्त आयुक्तही राज्य सेवेतीलच आले आहेत. अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे यांची पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी राज्य सरकारने नियुक्ती केली. थोरवे यांनी महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह साता-याचे जिल्हाधिकारी असताना त्यांच्यासोबत काम केले. त्यामुळे आयुक्तांनी शिफारस करुन मर्जीतील अधिकारी आणल्याचे बोलले जावू लागले. थोरवे यांची कोणत्या अतिरिक्त आयुक्तांच्या जागी नियुक्ती केली, हे आदेशात म्हटले नाही. त्यामुळे स्थानिक अधिका-यांसाठीच्या तिस-या अतिरिक्त आयुक्तपदाचा प्रभारी पदभार असलेल्या नगरसचिव उल्हास जगताप यांना खुर्ची सोडावी लागणार आहे. राज्य सेवेतील तिसरे अतिरिक्त आयुक्त आल्याने स्थानिक अधिका-यांमध्ये नाराजीचा सूर दिसत आहे.**

# जीवनशैली उंचावण्यासाठी प्रशासनाचा "संकल्प"

## नागरिकांना आवाहन : महापालिका उपक्रमात सहभागी व्हा!

**।पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी चिंचवड शहर हे राहण्यायोग्य उत्तम शहर असून या शहरात दर्जेदार सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगाने शहरामध्ये होणाऱ्या या सर्वेक्षण मोहीमेत नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग वाढावा, यासाठी महापालिका प्रयत्न करीत असून त्याहष्टीने या मोहिमेची विविध माध्यमाद्वारे जनजागृती करण्यात येत असून या उपक्रमाला अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ आणि उल्हास जगताप यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपआयुक्त रविकिरण घोडके, अ क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी तसेच रिक्षाचालक उपस्थित होते. केंद्र शासनाच्या अर्बन आउटकम्स फ्रेमवर्क २०२२ या उपक्रमाअंतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध उपक्रम आणि योजना राबविल्या जात आहेत.

तसेच केंद्रीय गृहनिर्माण आणि शहर विकास मंत्रालयाद्वारे देशातील शहरांमधील ऑनलाईन नागरी सुविधांची उपलब्धता आणि वापर समजून घेण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

२३ डिसेंबर २०२२ पर्यंत देशभरात हा उपक्रम राबविण्यात येणार असून सिटीझन परसेप्शन सर्वेक्षण करण्यात येत आहे. नागरीकांचा सहभाग वाढविण्यासाठी ॲटोरिक्षांवर पोस्टर्स लावून याबाबत जनजागृती करण्याबाबतची मोहिम आजपासून सुरु करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना याबाबत माहिती व्हावी, यासाठी क्षेत्रीय कार्यालयांमध्ये "अर्बन आउटकम्स फ्रेमवर्क २०२२" उपक्रमाचे स्टँडी उभारण्यात आले आहे.

महापालिकेच्या वतीने "अर्बन आऊटकम्स फ्रेमवर्क २०२२" च्या अनुषंगाने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी HTTPS://BIT.LY/EOL2022 या लिंकवर क्लिक करून युएलबी कोड ८०२८११ द्वारे सर्वेक्षण फॉर्म भरून घ्यावयाचा आहे. तसेच, प्रतिक्रिया नोंदवून पिंपरी चिंचवड शहराला स्पर्धेमध्ये विजयी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

# शिवराय सर्वांसाठी कायमच आदर्श!;फडणवीस यांची स्पष्टोक्ती

## राज्यपालांच्या विधानाचा विपर्यास झाल्याचा दावा

**पुणे । महाईन्यूज ।**

**छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचेच आदर्श आहेत. सूर्य, चंद्राचे अस्तित्व असेपर्यंत शिवराय हे सर्वांसाठी आदर्श राहतील, अशी स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली. शिवरायांबाबत राज्यपालांनी केलेल्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचा दावाही फडणवीस यांनी केला.**

शिवरायांबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजप प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केलेल्या विधानाचे राज्यात तीव्र पडसाद उमटत आहेत. महाविकास आघाडीने भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र पोलीस दलाच्या अखिल भारतीय पोलीस रेसिलग क्लस्टर स्पर्धेच्या समारोपानंतर फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राज्यपालांच्या विधानाबाबत फडणवीस यांना विचारले असता, ते म्हणाले,“छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, शौर्याची




माहिती देशातील सर्वांना आहे. राज्यपालांनाही त्यांची माहिती आहे. त्यांच्या विधानाचा विपर्यास करून विनाकारण वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्र आणि देशासाठी छत्रपती शिवाजी महाराजांव्यतिरिक्त दुसरा कोणताही आदर्श असू शकत नाही.” सुधांशू त्रिवेदी यांच्या विधानाबाबत फडणवीस म्हणाले की, “त्यांचे विधान मी नीट ऐकले आहे. महाराजांनी माफी मागितली, असे सुधांशू यांनी कुठेही म्हटलेले नाही.”

### ‘पोलीस बदल्या नियमानुसारच’

**» पोलीस दलातील बदल्यांविषयी नाराजी असल्याबाबत विचारला असता, अधिकाऱ्यांच्या बदल्या नियमानुसारच केल्या आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले. पुण्यात राज्य पोलीस क्रीडा प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यापूर्वीच हा प्रस्ताव मार्गी लावण्यात येणार होता. मात्र, करोना संसर्गामुळे या प्रस्तावाला काही प्रमाणात विलंब झाला. आता पुण्यात अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. लवकरच त्याचे काम सुरू होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.**

# जुनी पेन्शन योजनेसाठी सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

**पुणे । महाईन्यूज ।**



पुणे : राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने विविध सरकारी कार्यालयांसमोर आंदोलनपूर्व निदर्शने करण्यात येत आहेत. या अंतर्गत सोमवारी धर्मादाय सह आयुक्त कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली.

पुणे शहर आणि जिल्ह्यात २१ ते २५ नोव्हेंबरदरम्यान जुनी पेन्शन मागणी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सर्व सरकारी कार्यालयांसमोर दररोज निदर्शने करण्यात येत आहेत. या अंतर्गत धर्मादाय सह आयुक्त कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी आज सायंकाळी निदर्शने केली. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या पुणे जिल्हा शाखेचे अध्यक्ष मारुती शिंदे, राज्य सरकारी गट ‘ड’ चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या पुणे जिल्हा शाखेचे अध्यक्ष श्रीकृष्ण साळवी, पुणे विभागीय उपाध्यक्ष दिनेश कुचेकर, बसवराज कलदगी यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

# भाज्यपाल हटावो, महाराष्ट्र बचावोपुण्यात डमी राज्यपाल आणत राष्ट्रवादीचे आंदोलन

**पुणे। महाईन्यूज ।**



छत्रपती शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त विधान केल्या प्रकरणी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झाली आहे. ‘काळी टोपी हटाव’ असा हल्लाबोल करत छत्रपती महाराजांचा अपमान करणाऱ्या व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या विरोधात सारसबाग जवळील सावरकर पुतळा येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले.

‘भगतसिंग कोश्यारी नही चलेंगी होशीयारी, काळी टोपी काळे मन हेच भाजपचे अंतरमन, भाज्यपाल हटावो महाराष्ट्र बचावो, सुधांशु त्रिवेदींचा धिक्कार असो,अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. प्रवक्ता प्रदीप देशमुख, संतोष नांगरे , माजी नगरसेविका प्रिया गदादे , किशोर कांबळे , वनराज आंदेकर , महेश शिंदे ,बाबा पटील , महिला शहराध्यक्ष मृणालिनी वाणी, श्वेता होनराव , पार्थ मिठकरी , गणेश मोहीते, मनाली भिलारे यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यपाल पदावर असणाऱ्या व्यक्तीने त्या संबंधित राज्याची संस्कृती, लोकभावना याबाबत आदर बाळगणे अपेक्षित असते.

# रुपी’च्या उर्वरित ठेवीदारांना ३०० कोटी मिळणार

## उर्वरित 80 हजार ठेवीदारांना ठेवी परत करण्याबाबत ‘डीआयसीजीसी’कडून मंजुरी मिळाली

**पुणे । महाईन्यूज ।**

अवसायनात निघालेल्या रुपी सहकारी बँकेच्या ७० हजारांहून अधिक ठेवीदारांना ठेव विमा महामंडळाकडून (डीआयसीजीसी) ७०० कोटींच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. उर्वरित ८० हजार ठेवीदारांना ठेवी परत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या ठेवीदारांना ३०० कोटींच्या ठेवी परत करण्यात येणार आहेत.

रिझर्व्ह बँकेकडून २०१३ मध्ये रुपी बँकेच्या आर्थिक व्यवहारावर निर्बंध लादण्यात आले. २०१६ मध्ये चौकशीअंती तत्कालीन १५ संचालकांसह एकूण ६९ जणांविरुद्ध गैरव्यवहारप्रकरणी गुन्हे दाखल झाले. त्यांच्यावर कलम ८८ नुसार एक हजार ४९० कोटी रुपयांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यानुसार संचालकाच्या जप्त मालमत्तेची विक्री करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बँकेचे प्रशासक आणि ठेवीदारांकडून रुपीचे सक्षम बँकेत विलीनीकरण करण्याचे प्रयत्न झाले. परंतु अवसायक नेमल्यानंतर रुपी बँकेचे अस्तित्व जवळपास संपुष्टात आले आहे.

ठेव विमा महामंडळाकडून पाच




लाख रुपयांच्या आतील ठेवीदारांना रकमा देण्याची प्रक्रिया सुरू झाली. बँकेचे सुमारे पाच लाख ठेवीदार असून, त्यापैकी ७० हजार ठेवीदारांना ७०० कोटी रुपये परत करण्यात आले आहेत. उर्वरित ८० हजार ठेवीदारांना ठेवी परत करण्याबाबत ‘डीआयसीजीसी’कडून मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार ३०० कोटींच्या ठेवी परत करण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

पाच लाखांपेक्षा अधिक ठेव असलेल्या ठेवीदारांची संख्या सुमारे पाच हजार आहे. त्यापैकी साडेतीन हजार ठेवीदारांना प्रत्येकी पाच लाख रुपये परत केले आहेत. उर्वरित दीड हजार ठेवीदारांनी दमडीही घेतलेली नाही. तर, दोनशे, पाचशे रुपये, एक ते १० हजार रुपयांपर्यंतच्या ठेवीदारांची संख्या साडेतीन लाख आहे, अशी माहिती बँकेकडून देण्यात आली.

### कर्मचाऱ्यांचे भविष्य अधांतरी

रुपी बँकेत सध्या २१० अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. कर्जदारांकडून रक्कम वसूल करण्यासह ठेवीदारांचे पैसे परत करण्याचे काम सुरू आहे. ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याची ही प्रक्रिया सुमारे सहा महिने चालेल. त्यानंतर या कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भविष्यात नेमके काय होणार, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. या संदर्भात राज्य सरकार आणि सहकार विभागाला योग्य निर्णय घ्यावा लागणार आहे.

## समाविष्ट गावांत पर्यायी रस्त्यांचे जाळे विकसित करणार

# ‘इंडस्ट्रिअल अ‍ॅन्ड रेसिडेंसिअल कॉरीडॉर’ होणार वाहतूक कोंडी मुक्त!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या प्रशासनाला सूचना

**पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवडतून जाणारा पुणे-नाशिक महामार्गावसह इंडस्ट्रिअल अ‍ॅन्ड रेसिडेंन्सिअल कॉरिडॉरमधील दिवसेंदिवस वाढणारा वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी समाविष्ट गावांमधील मुख्य रस्त्यांना पर्यायी रस्त्यांचे जाळे निर्माण करुन वाहतूक सुरळीत आणि सक्षम करावी. त्यासाठी महापलिका प्रशासनाने ताताडीने नियोजन आराखडा तयार करावा, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केल्या आहेत.**





याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच नियोजन आराखडा तयार करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात आला असून, त्यामुळे प्रचंड नागरीकरण वाढले आहे. परिणामी, पुणे- नाशिक महामार्गासह भोसरी विधानसभा मतदार संघातील तळवडे ते मोशी पट्ट्यामध्ये नियमित वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. आगामी ५० वर्षांत वाढती लोकसंख्या आणि वाढते नागरीकरण याचा विचार करता मुख्य रस्त्याला जोडणारे पर्यायी मार्गांचे जाळे निर्माण केल्यास मुख्य रस्त्यावरील ताण कमी होणार आहे.

पुणे- नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या हेतूने चिखलीमधील साने चौक ते चिखली हा रस्ता २४ मीटर रुंद करावा. चिखली गाव ते सोनवणेवस्ती मार्गे ज्योतिबानगर, तळवडे या रस्त्याचे २४ मीटर रुंदीकरण करावे. तसेच, नव्याने विकसित करण्यात येणारा कॅनबे चौक, तळवडे ते रेडझोनमधून भक्ती-शक्ती चौकाला जोडणारा रस्ता १८ मीटर रुंद करावा. इंद्रायणी नदी पात्रालगत तळवडे ते चिखली हा सध्या १२ मीटर असलेला रस्ता २४ मीटर रुंद करण्यात यावा. तसेच, चिखली- तळवडे शिव रस्ता विकसित करण्यात यावा. त्यासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी, अशा सूचना आमदार लांडगे यांनी केल्या आहेत.

### पर्यायी रस्त्यांद्वारे मुख्य रस्त्याचा ताण कमी करावा...

**आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडचे वाढते शहरीकरण आणि चाकण औद्योगिक पट्टा, तळवडे आयटी पार्क परिसरातील वाढती वाहतूक कोंडीचा सामना केल्याशिवाय कोणत्याही चाकण, नाशिकहून येणाऱ्या वाहनचालकाला पुणे शहरात जाता येत नाही, ही आजची स्थिती आहे. गेल्या १५ ते २० वर्षांत आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. गेल्या चार-पाच वर्षांत या भागातील अंतर्गत रस्त्यांची कामे हाती घेतल्यामुळे काहीप्रमाणात वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली आहे. मात्र, आगामी ५० वर्षांत शहराचे नागरीकरण लक्षात घेता पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक अन्य पर्यायी रस्त्यांवर वळवणे अत्यावशक आहे. केवळ मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करुन चालणार नाही, तर पर्यायी रस्ते निर्माण करुन त्या-त्या भागातील वाहतूक अन्य मार्गावर सुरू करुन मुख्य रस्त्याचा ताण कमी करता येईल, असा दावा आमदार महेश लांडगे यांनी केला आहे.**



### अधिकारी काय म्हणताहेत...

**समाविष्ट गावांमधील पर्यायी रस्त्यांबाबत भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत प्रशासन सकारात्मक आहे. जागेचा ताब मिळाल्यावर तरतूद करुन रस्त्यांची कामे मार्गी लावण्यात येतील. चाकण औद्योगिक पट्ट्यातून मुख्य रस्त्यावर येणारी वाहतूक विभाजन झाल्यास वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल.**

**-विजयकुमार काळे,** कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, फ-क्षेत्रीय कार्यालय.

**पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका आयुक्त आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये बैठक झाली होती. त्यानुसार सर्व्हेक्षण करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. आयुक्तांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, प्रशासकीय कार्यवाही करुन लवकरात लवकर कामे सुरू करण्याची प्रशासनाची भूमिका आहे.**

- **मकरंद निकम,** सह शहर अभियंता, स्थापत्य विभाग.

**तळवडे ते चिखली २४ मीटर रस्ता प्रस्तावित आहे. सुधारित विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. सुमारे २५ टक्के जागा मनपाच्या ताब्यात असून, उर्वरित जागा ताब्यात घेण्याबाबत भूसंपादन प्रस्तावाची कार्यवाही चालू आहे. देहू-आळंदी रस्त्यावरील कॅनबे चौक ते मुंबई-पुणे महामार्गास भक्ती-शक्ती चौकापर्यंत २४ मीटर रस्त्याची मागणी होत आहे. तथापि सदरचा रस्ता महापालिका हद्दीबाहेरील रेडझोनमधून जात असल्यामुळे संरक्षण विभागाची परवानगी घ्यावी लागणार आहे. चिखली ते तळवडे रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे.**

- **संदेश खडतरे,** सहायक संचालक, नगररचना विभाग.

## संपादकीय »

# यात्रेचा ‘महाराष्ट्राध्याय’

***राहुल गांधी यांच्या बहुचर्चित ‘भारत जोडो!’ यात्रेचा आज पंच्याहत्तरावा दिवस असून रविवारी रात्री या यात्रेने महाराष्ट्राची सीमा ओलांडून मध्य प्रदेशात बुऱ्हाणपूर येथे आपला पडाव टाकला आहे. यात्रा आता दोन दिवसांचा विराम घेणार असताना, महाराष्ट्रात या यात्रेला जो काही प्रतिसाद मिळाला त्यावर एक नजर टाकणे आवश्यक आहे.***

महाराष्ट्रात या यात्रेत विविध वैचारिक तसेच सामाजिक स्तरांतील जनांचा इतका मोठा प्रवाहो सामील होईल, याची कोणालाच म्हणजे काँग्रेसच्या बड्या नेत्यांनाही कल्पना नसणार. लालकृष्ण अडवाणी यांनी १९९०मध्ये सोमनाथाहून अयोध्येच्या दिशेने काढलेल्या यात्रेलाही असाच मोठा प्रतिसाद देणारा मराठी माणूस या ‘नफरत छोडो...’ भूमिकेसाठी काढलेल्या यात्रेत उदंड उत्साहाने सामील झाला, हे कुणाला आश्चर्य वाटेलही. पण हा प्रतिसाद हे तर वास्तव आहे. देशात एकीकडे भारतीय जनता पक्ष ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेला वेग देत असतानाच, राहुल गांधी यांनी लोकांचे लक्ष महागाई, देशात पडत असलेली फूट, तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न याकडे वळवण्यात मोठे यश मिळवले आहे.

शेगाव येथील त्यांच्या सभेला झालेली अभूतपूर्व गर्दी या यशाची साक्ष देत आहे. कोणत्याही नेत्याच्या यशाची पहिली पायरी ही आपल्याबद्दल जनतेच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण करण्यात तो किती यशस्वी होतो, यावर अवलंबून असते. हा विचार केला तर या उपक्रमाला बरेच यश मिळाले, हे मान्य करावे लागेल. जनतेचा उत्स्फूर्त सहभाग; तसेच खुद्द राहुल गांधी यांची याच ७५ दिवसांत बदललेली देहबोली, त्यांच्यात दिसलेला आत्मविश्वास या बाबी नोंद घेण्याजोग्या आहेत,हे निःसंशय. राहुल गांधींच्याबद्दल लोकांच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत, हे यात्रेच्या निमित्ताने दिसून आले.

अवघ्या अडीच-तीन दशकांपूर्वीपर्यंत काँग्रेसचे पारंपरिक विरोधक असलेले डावे तसेच समाजवादी कार्यकर्ते यांचा सहभागही लक्ष वेधून घेणारा होता. यात्रा भारताच्या दक्षिण टोकापासून सुरू झाली, तेव्हा भाजप नेतेमंडळी तसेच त्यांचे पाठीराखे यात्रेची खिल्ली उडवण्यात मश्गूल होते. राहुल गांधी हे विवेकानंद स्मारकास्थळी गेलेच नाहीत, अशी आवई उठवण्यापासून ते यात्रेमुळे वाहतुकीची कोंडी होईल, म्हणून यात्रा रोखण्याची मागणी न्यायालयात करण्यापर्यंत भाजप समर्थकांनी मजल गाठली होती. प्रत्यक्षात यात्रा आपल्या गतीने सुरू राहिली. यात्रेला महाराष्ट्रात मिळालेला प्रतिसाद दक्षिणेतील राज्यांपेक्षाही मोठा होता आणि त्यामुळेच राज्यातील सुस्तावलेल्या काँग्रेस नेत्यांनाही खडबडून जाग आल्याचे दिसत आहे. प्रदेश पातळीवरील काँग्रेस नेत्यांचा नाही म्हटले तरी सर्वसामान्य जनतेशी असलेला धागा गेल्या काही वर्षांत निसटला होता. यात्रेमुळे तो पुन्हा जोडण्याचे काम होऊ शकते.

# अशी टाळा ई-फसवणूक



भूमिका

दररोज बदलते तंत्रज्ञान आवाक्यात आले, तेव्हा सर्वसामान्यांची अनेक कामे हलकी झाली आहेत. मात्र, या सुविधा मिळत असतानाच तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेण्याचे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत. देशातील अनेक शहरांमध्ये ऑनलाइन फसवणुकीच्या शेकडो घटना घडत आहेत. फसवणुकीला बळी पडण्यापूर्वीच थोडीशी काळजी घेतल्यास पुढील त्रास टळू शकतो. त्यामुळेच इंटरनेटशी जोडलेली कोणतीही यंत्रणा वापरताना आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी थोडी खबरदारी घेणे गरजेचे आहे. फोन करणाऱ्या व्यक्तीने बँकेचा, कुठल्याही खात्याचा, कंपनीचा ऑफिसर असल्याचे सांगितले, तरीही ‘ओटीपी’ (वन टाइम पासवर्ड) देऊ नये. यूपीआय पिन, एटीएम-डेबिट-क्रेडिट कार्ड यांचा पिन, तसेच सीव्हीव्ही (मागील बाजूस असलेला तीन आकडी कोड), बँक खाते क्रमांक कोणालाही देऊ नये. यूपीआयद्वारे पेमेंट करताना नाव ‘व्हेरिफाय’ आहे का, हे तपासून बघावे. यूपीआय पिन, क्यूआर कोड स्कॅन करणे हे पैसे देताना करावे लागते. आपल्याला पैसे मिळण्यासाठी कधीच करावे लागत नाही. जुन्या वस्तू एखाद्या साइटवरून ऑनलाइन विकताना समोरचा फसवा माणूस ‘पैसे पाठवता येत नाहीत’ वगैरे सांगून क्यूआर कोड स्कॅन करण्यास सांगेल. मात्र, हा प्रकार पैसे लुबाडण्यासाठी असतो, हे ध्यानात ठेवले पाहिजे. सायबर चोरटे फोन करून, बोलण्यात गुंतवून ओटीपी किंवा पिन मागणे, क्यूआर कोड स्कॅन करणे याची घाई करतात. त्या वेळी थेट फोन बंद करा आणि जाणकारांकडून माहिती घ्या.

एटीएम-डेबिट-क्रेडिट कार्ड यांच्या दैनंदिन वापराची मर्यादा निश्चित करता येते. उदाहरणार्थ, एटीएममधून एका दिवसात १० हजार रुपये किंवा अमुक रकमेच्या वर पैसे निघणार नाहीत, एका दिवसात फक्त अमुक रकमेच्या मर्यादेपर्यंतच ऑनलाइन व्यवहार करता येतील इत्यादी. परदेशात



जाणार नसल्यास कार्डाचा इंटरनॅशनल वापर बंद करून ठेवावा. एटीएम सेंटरमध्ये पैसे काढताना अनोळखी माणसाची मदत घेऊ नका. लोभ व भीती ही फसवणूक होण्याची मुख्य दोन कारणे आहेत. रक्कम किंवा फायदा होणार असल्याचे प्रलोभन दाखवले जाते किंवा सेवा खंडित होईल अथवा नुकसान होईल अशी भीती दाखवली जाते आणि त्यातून या घटना घडतात. केवायसी अपडेट करण्याबाबत मेसेजेस, मेल पाठवणे किंवा फोन करून फसवणूक करणे हे अधिकृत असल्याची खात्री ऑफिसला, बँकेला भेट देऊन करा.मात्र, ठाकरे यांनी त्याला स्थगिती दिली. दरम्यानच्या काळात या प्रकल्पाचा खर्च सुमारे दहा हजार कोटी रुपयांनी वाढला. काही प्रकारांमध्ये सोशल मीडियावरील भारतीय अथवा परदेशी व्यक्तीबरोबर ओळख होते. त्यानंतर या व्यक्ती ओळख वाढवून विश्वास संपादन करतात आणि भलीमोठी रक्कम देण्याचे आमिष दाखवून प्रोसेसिंग फीच्या नावाखाली थोडे थोडे करून पैसे उकळतात. फिशिंग ई-मेल्स या प्रकारात बँक, रिझर्व्ह बँक, प्राप्तिकर खाते किंवा सरकारी विभाग यांच्या नावाने गुन्हेगार मेल पाठवतो आणि आपल्या बँक खात्याचा, वैयक्तिक तपशील मागतो किंवा एक लिंक देऊन, त्या लिंकवर तपशील अपडेट करण्यास सांगतो. कोणतीही बँक, रिझर्व्ह बँक किंवा प्राप्तिकर खाते असे तपशील कधीही, कोणत्याही परिस्थितीत मागत नाहीत. काही वेळा ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने तुमच्या सुरक्षिततेसाठी एक नवी सिस्टीम सुरू केलेली आहे, मेलमध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करा व तुमचे खाते असलेली बँक निवडा,’ अशी फ्रॉड मेल येते. रिझर्व्ह बँक देण्याघेण्याचे व्यवहार करीत नाही. व्यवसाय किंवा कारणाव्यतिरिक्त आपला फोन नंबर सोशल मीडियावर कधीही देऊ नये. अनोळखी नंबरवरून आलेल्या व्हिडिओ कॉलवर काही वेळा बोलता बोलता स्त्री कपडे काढते व त्याचे रेकॉर्डिंग केले आहे सांगून धमकी दिली जाते. ‘बदनामी नको असेल, तर पैसे द्या,’ अशी मागणी केली जाते. अशा वेळी सायबर सेलकडे तक्रार करावी. विमा पॉलिसीच्या फसवणुकीचा एक प्रकार काही वर्षांपूर्वी वाढला होता.

# घरोघरीच्या जेवणाशी भिडणारं आंतरराष्ट्रीय राजकारण...

**यावर्षी अगदी युरोपीयन युनियनमधील देशांनाही आपल्या अन्नसुरक्षेला अधिक प्राधान्य दिल्यामुळे दुर्लक्षित असलेला अन्नधान्य राजनय आता आंतरराष्ट्रीय संबंधांत मध्यवर्ती भूमिकेत आला आहे.**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये खनिज तेल, शस्त्रास्त्र व्यापार, लष्करी सहकार्य, आण्विक तंत्रज्ञान, अणुभट्ट्या, अणुइंधन हे विषय कायमच मध्यवर्ती असतात. पण, युक्रेन-रशिया युद्ध आणि जागतिक तापमान वाढीचा परिणाम म्हणून या वर्षात अन्नधान्य हा विषय आंतरराष्ट्रीय संबंधांत केंद्रस्थानी आला आहे. आफ्रिकी देशांमधील अन्नधान्य टंचाईचा प्रश्न जागतिक राजकारणात कायमच चर्चेचा विषय असतो. पण, यावर्षी अगदी युरोपीयन युनियनमधील देशांनाही आपल्या अन्नसुरक्षेला अधिक प्राधान्य द्यावे लागले. त्यामुळेच आजवर दुर्लक्षित असलेला अन्नधान्य राजनय आता आंतरराष्ट्रीय संबंधांत मध्यवर्ती भूमिकेत आला आहे. त्या विषयी... इंडोनेशियातील बाली येथे झालेल्या जी-२० देशांच्या शिखर परिषदेत सदस्य देशांनी रशिया विरोधात कठोर भूमिका घ्यावी, असा अमेरिकेचा आग्रह होता. पण, भारतासह अन्य विकसनशील देशांनी त्याला विरोध



केला. तसे केल्यास खनिज तेल, खते आणि अन्नधान्यांच्या महागाईचा भडका उडेल आणि ही महागाई सहन करण्याची आर्थिक क्षमता विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये राहिलेली नाही, असे अमेरिकेला समजेल अशा स्पष्ट भाषेत सांगण्याचे धाडस या देशांनी दाखविले. त्यामुळे रशिया, रशिया समर्थक देश आणि युक्रेनमधून होणाऱ्या अन्नधान्य, खते आणि खनिज तेलांच्या आयातीवर कोणतेही निर्बंध आणण्यास उघडपणे विरोध करण्यात आला. यापूर्वी अशी अमेरिकेच्या विरोधात जाहीर भूमिका घेण्याचे धाडस विकसनशील दाखवत नव्हते. यावेळी असे घडले कारण अन्नसुरक्षा हा अत्यंत कळीचा मुद्दा ठरला आहे.युक्रेन-रशिया युद्धाने जगाची अन्नसुरक्षा अडचणीत आणली आहे. भारत, चीन हे देश कृषी उत्पादनात जगात अग्रेसर आहेत. पण, या दोन देशांची भूक इतकी प्रचंड आहे की, निर्यातसाठी फारस काही शिल्लकच राहत नाही. भारतात तर एखाद्या शेतीमालाची निर्यात वाढतात देशांतर्गत बाजारात त्या कृषीमालाच्या दराचा भडकाच उडतो. यंदा गव्हाच्या बाबतीत हेच झालं. त्यामुळे भारत आणि चीनमधून अन्नधान्यांची निर्यात अत्यंत किरकोळ होते. त्यामुळेच आजवर अन्नधान्यांची निर्यात करणारा देश अशी भारताची ओळख निर्माण होऊ शकली नाही. ही ओळख युक्रेन आणि रशियाने निर्माण केली आहे. जागतिक गव्हाच्या उलाढालीत या दोन्ही देशांचा वाटा सुमारे तीस टक्के आणि मक्याचा वाटा अठरा टक्के आहे. रशियाच्या तुलनेत अत्यंत लहान असलेल्या युक्रेनचा गव्हाच्या उलाढालीत दहा टक्के तर मक्याच्या उलाढालीत सोळा टक्के वाटा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### साडेचारशे परदेशी नागरिकांची हकालपट्टी

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या ४५० परदेशी नागरिकांना देशातून हद्दपार करण्यात आले आहे. यामध्ये ४०० पेक्षा अधिक नागरिक आफ्रिका खंडातील असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. परदेशी नागरिक विभागीय नोंदणी कार्यालयाने (एफआरआरओ) कारवाई केली. भारतातच राहण्यासाठी छोटेमोठे गुन्हे करून त्याचा खटला निकाली निघेपर्यंत इथेच राहण्याची पळवाट अनेक परदेशी नागरिक शोधतात. गेल्या वर्षी देशभरात ७९८ नायजेरिया व आफ्रिकी देशातील नागरिकांविरोधात गुन्हे दाखल झाले होते. परदेशी नागरिक भारतात आल्यावर तो येथे राहत असलेल्या हॉटेल अथवा ठिकाणाची माहिती देणे बंधनकारक असते. त्यासाठी त्यांना अर्ज क नमुना भरावा लागतो. त्यात त्यांची वैयक्तिक माहिती, सध्याचा पत्ता व संबंधित ठिकाण अथवा व्यक्तीचा दूरध्वनी क्रमांक द्यावा लागतो.

# सनदशीर, लोकशाही मार्गाने मार्गाने सीमाप्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध–उपमुख्यमंत्री फडणवीस

## न्यायालयीन प्रक्रियेच्या समन्वयासाठी चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाईंची नियुक्ती

। मुंबई। महाईन्यूज ।

**"सीमाप्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. याप्रश्नी महाराष्ट्रातील सर्व राजकिय पक्ष एकत्र आहेत. सनदशीर, लोकशाही मार्गाने हा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आम्ही सर्व जण सीमावासीयांबरोबर आहोत.", अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.**

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात उच्चाधिकारी समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, समितीचे सदस्य मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, डॉ. तानाजी सावंत, दीपक केसरकर, शंभूराज देसाई, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, आमदार पृथ्वीराज चव्हाण, राजेश क्षीरसागर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ज्येष्ठ संपादक किरण ठाकूर आणि महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य उपस्थित होते. यासंदर्भातील कायदेशीर लढाईसाठी वरिष्ठ विधीज्ञ वैद्यनाथन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर न्यायालयीन प्रक्रियेच्या समन्वयासाठी चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई या दोन मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली आहे." यावेळी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे प्रकाश मरगाळे, दिनेश ओऊळकर, विनोद आंबेवाडकर यांनी सीमा भागातील विविध समस्यांची माहिती यावेळी दिली. सीमा प्रश्नाच्या न्यायालयीन लढाईसाठी ज्येष्ठ विधीज्ञ वैद्यनाथन यांची नियुक्ती केल्याबद्दल समितीच्या सदस्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.



**सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात उच्चाधिकारी समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, समितीचे सदस्य मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, डॉ. तानाजी सावंत, दीपक केसरकर, शंभूराज देसाई, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, आमदार पृथ्वीराज चव्हाण, राजेश क्षीरसागर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ज्येष्ठ संपादक किरण ठाकूर आणि महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य उपस्थित होते. यासंदर्भातील कायदेशीर लढाईसाठी वरिष्ठ विधीज्ञ वैद्यनाथन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर न्यायालयीन प्रक्रियेच्या समन्वयासाठी चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई या दोन मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली आहे."**

### बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वपूर्ण निर्णय

**सीमा भागात पूर्वीप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. त्याचबरोबर सीमा भागात महाराष्ट्र शासनाची महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्यात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. सीमा आंदोलनातील हुतात्म्यांच्या कुटुंबियांना स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणेच निवृत्तीवेतन देण्याच निर्णय याबैठकीत मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्याचबरोबर न्यायालयीन लढाईसाठी एकीकरण समितीने अदा केलेल्या शुल्काच्या प्रतिपूर्तीचा निर्णयही घेण्यात आला.**

# मुंबईत ठाकरे-शिंदे गट पुन्हा आमने-सामने

## विकासकामाच्या श्रेयवादावरून जोरदार घोषणाबाजी

।कराड। महाईन्यूज ।

अलीकडेच ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरातील किसननगर येथे ठाकरे आणि शिंदे गटात जोरदार राडा झाला होता. या वादात एकनाथ शिंदे यांच्या समर्थकांनी ठाकरे गटातील दोन कार्यकर्त्यांना जबर मारहाण केली होती. ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांच्यासमोरच ही मारहाण झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. ही घटना ताजी असताना असताना आता मुंबईतील प्रभादेवी येथील विकासकामाच्या श्रेयवादावरून ठाकरे आणि शिंदे गट आमने-सामने आले आहेत.

मुंबईतील प्रभादेवी परिसरातील रस्त्याचं आणि पदपथाच्या कामावरून दोन्ही गट आमने-सामने आले आहेत. शिंदे गटाचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या कार्यकाळात संबंधित कामाला सुरुवात झाली होती, असा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. त्यामुळे या कामाचं उद्घाटन समाधान सरवणकर यांच्या हस्ते करण्यात येत होतं. पण यावर ठाकरे गटाकडून आक्षेप घेण्यात आला आहे.



# पारंपरिक मच्छीमार का अडकलेत समस्यांच्या जाळ्यात?

## गेल्या काही वर्षांत मासेमारीचा अतिरेक होत आहे

। मुंबई । महाईन्यूज ।

मासेमारी हंगाम सुरू होऊन साडेतीन महिन्यांचा कालावधी उलटला असला तरीही यंदाच्या हंगामात मत्स्य उत्पादन कमी असल्याने खोल समुद्रात पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बोटींपैकी सुमारे ५० ते ६० टक्के बोटी अजूनही किनाऱ्यावरच आहेत. घटलेल्या मत्स्य उत्पादनामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणारा मच्छीमार बांधव वेगवेगळ्या समस्यांच्या जाळ्यात सापडल्याचे चित्र आहे. २१ नोव्हेंबर रोजी जागतिक मच्छीमार दिनानिमित्त त्यांच्या समस्यांचा हा विश्लेषणात्मक आढावा.

मासेमारीची सद्यःस्थिती काय आहे?

१ ऑगस्टपासून मासेमारीला आरंभ झाला व पहिल्याच फेरीपासून माशांची पकड तुलनात्मक अत्यल्प होऊ लागली. खोल समुद्रात १०-१२ दिवसांच्या मासेमारी फेरीकरिता सव्वा ते दीड लाख रुपये खर्च येत असतो. पहिल्या काही फेऱ्यांमध्ये मासेमारीसाठी होणारा खर्चदेखील मत्स्य उत्पादनातून भागला नाही. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील २०२२ मासेमारी बोटींपैकी खोल समुद्रात जाणाऱ्या बहुतांश बोटी अधिक आर्थिक नुकसान होऊ नये किनाऱ्यावरच नांगरून ठेवण्याचा निर्णय मच्छीमारांना घ्यावा लागला.



### मत्स्योत्पादन कमी होण्यामागील कारणे कोणती?

**गेल्या काही वर्षांत मासेमारीचा अतिरेक होत आहे. बोटिंगच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यास शासन अपयशी ठरल्याने मासे मिळविण्यासाठी पारंपरिक संकेत व हद्दी ओलांडून अतिक्रमण होत असल्याचे आरोप-प्रत्यारोप होत आहेत. शिवाय कमी आसाच्या जाळ्यांमुळे लहान आकाराचे व कमी वयोमानाचे मासे पकडले जात आहेत. त्याचबरोबर पर्ससीन व एलईडी मासेमारी पद्धतीनेही मत्स्य उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे.**

### त्याचा परिणाम काय जाणवतो?

**मासेमारी व्यवसायावर रोजगाराची मोठी साखळी अवलंबून आहे. जाळी विणणे व त्यांची दुरुस्ती करणाऱ्या कारागिरांपासून बोटीमध्ये बर्फ व इतर सामग्री बोटीवर चढवणे, मिळालेल्या माशांचे वर्गीकरण करणे, घाऊक बाजारात मासे विक्रीसाठी नेणे व नंतर माशाची किरकोळ विक्री करणे, सुक्या माशांची विक्री करणे अशी ही रोजगारीची साखळी असते. एका मासेमारी बोटीमधून सुमारे ५०-६० कुटुंबांना प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त होत असून या सर्व घटकांना कमी झालेल्या मासेमारीचा फटका बसला आहे. शिवाय बोटीच्या दुरुस्तीसाठी तसेच इंधनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची परतफेड न झाल्याने मच्छीमार बांधव कर्जबाजारी झाले आहेत. सातपाटी येथील मच्छीमार बोट मालकांच्यावर सध्या नऊ कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे.**

### मच्छीमारांना इतर कोणत्या समस्या भेडसावतात?

पालघर जिल्ह्यातील मच्छीमारांना डिझेल परताव्यापोटी शासनाकडून १६ कोटी रुपये प्राप्त होणे प्रलंबित आहे. अनेक ठिकाणी मासेमारी बंदर नसल्याने मच्छीमारांना बोटींमधून सामग्री चढविणे व मासे उतरविण्यास त्रासाला सामोरे जावे लागते. धूप प्रतिबंधक बंधारे नसल्याने मच्छीमार वसाहतीमध्ये उधाणाच्या वेळी घरांमध्ये पाणी शिरते. निवारण यंत्रणा व वादळ निवारा केंद्रांची उभारणी अनेक मासेमारी गावांमध्ये झाली नसल्याने तेथेही अडचणी जाणवतात.

# काँग्रेस राजघराणे, त्यांच्यासमोर माझी पात्रता नाही!

## पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर पलटवार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्ष जोरदार प्रचार करत आहेत. यादरम्यान पंतप्रधान मोदींनी आज गुजरातमधील सुरेंद्रनगरमध्ये एका सभेला संबोधित केले, यावेळी मोदींनी आपल्या भाषणातून काँग्रेसवर निशाणा साधला आहे, मोदी म्हणाले की, काँग्रेस म्हणतेय की, मोदींना त्यांची लायकी दाखवली जाईल, हा अहंकार आहे. तुम्ही राजघराण्यातील आहेत, मी सामान्य कुटुंबातील आहे, मी लोकसेवक आहे, मला आधीपासूनचं काही दर्जा मिळालेला नाही. काँग्रेस नेते मला काय काय नाही बोलले, नीच म्हणाले, गटारातील किडा म्हणाले, माझी कोणतीच लायकी नाही म्हणाले... मौत का सौदागर म्हणाले, अरे विकासाच्या मुद्यावर चर्चा करा ना. असे आव्हानही मोदींनी काँग्रेसला दिले आहे.



**मोदी म्हणाले की, काँग्रेस म्हणतेय की, मोदींना त्यांची लायकी दाखवली जाईल, हा अहंकार आहे. तुम्ही राजघराण्यातील आहेत, मी सामान्य कुटुंबातील आहे, मी लोकसेवक आहे, मला आधीपासूनचं काही दर्जा मिळालेला नाही. काँग्रेस नेते मला काय काय नाही बोलले, नीच म्हणाले, गटारातील किडा म्हणाले, माझी कोणतीच लायकी नाही म्हणाले... मौत का सौदागर म्हणाले, अरे विकासाच्या मुद्यावर चर्चा करा ना. असे आव्हानही मोदींनी काँग्रेसला दिले आहे.**

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, एक काळ होता जेव्हा गुजरातमध्ये सायकलही बनवली जात नव्हती. आज गुजरातमध्ये विमाने बनवली जात आहेत. 25 वर्षांच्या सुवर्णकाळासाठी पाच वर्षे खूप महत्त्वाची आहेत. यावर तरुणांचे भवितव्य अवलंबून असेल. तुमचे भविष्य घडवण्याची भूमिका फक्त भाजपच बजावू शकते. असा दावाही त्यांनी केला. जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, विकासाची चर्चा व्हायला हवी की नाही? कोणी किती काम केले, यावर चर्चा व्हायला हवी की नाही? पाणी पोहोचले की नाही, वीज पोहोचली की नाही, यावर चर्चा व्हायला हवी की नाही?

भाजपचा रेकॉर्ड मजबूत आहे हे काँग्रेसला माहीत आहे. काँग्रेस विकासाच्या मुद्द्यावर चर्चा करत नाही, आणि म्हणतात की, आम्ही मोदींना त्यांचा पात्रता दाखवू देऊ. हा अहंकार आहे भावांनो अहंकार. तुम्हाला माहिती आहे की, ते राजघराणं आहे, मी सामान्य कुटुंबातील मुलगा आहे, माझी कोणताही पात्रता नव्हती, तुम्हाला माझी स्थिती दाखवण्याची गरज नाही. अरे, मी सेवक आहे, सेवक.., मी तो सेवादार आहे, सेवकाला काही लाईकी असते का? असही मोदी म्हणाले.

---

## "इंदिरा गांधींची सत्ता गेली, एक दिवस मोदीही जातील"

### माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचा हल्लाबोल

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

सत्ता येते जाते हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समजून घेतले पाहिजे, असा सल्ला मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी दिला आहे. देशात अनेक प्रकारच्या लढाया सुरु होणार आहेत. शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलन केल्यास, तरुणही केंद्र सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतील, असेही सत्यपाल मलिक यांनी म्हटलं आहे.

सत्यपाल मलिक हे रविवार (अग्निपथ' योजनेवरूही सत्यपाल मलिक यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे. "अग्निपथ योजनेमुळे सैन्य कमकूवत होऊ शकते. तीन वर्षांची सेवा देताना सैनिकांना त्यागाची भावना राहणार नाही. अग्निवीर सैनिकांना ब्रम्होस्त्र सह अन्य क्षेपणास्त्रे आणि शस्त्र्यांना हात लावण्याची परवनागी दिली जाणार नाही. त्यामुळे 'अग्निपथ' ही योजना सैन्याची नासधूस करत आहे," असेही सत्यपाल मलिक यांनी सांगितलं. २० नोव्हेंबर ) राजस्थान विश्वविद्यालय छात्र संघाच्या एका कार्यक्रमात बोलत होते. तेव्हा मलिक यांनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला. "पंतप्रधान मोदींनी समजले पाहिजे की सत्ता येते जाते. इंदिरा गांधी यांचीही सत्ता गेली होती. पण, लोक बोलायचे त्यांना कोणी हटवू शकत नाही. एक दिवस तुम्ही सुद्धा निघून जाल. त्यामुळे परिस्थिती एवढीही नका बिघडवू की ती सुधरता येईल," असे मलिक यांनी म्हटलं.



---

## वंचित घटकांतील व्यक्तींबरोबर भोजन करा!

### मोहन भागवत यांचे संघ स्वयंसेवकांना आवाहन

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

संघाच्या स्वयंसेवकांच्या कुटुंबीयांनी जास्तीतजास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा, पाश्चात्य कुटुंब पद्धतीपासून दूर राहावे आणि सफाई कामगार किंवा समाजातील वंचित घटकातील कोणत्याही कुटुंबाबरोबर आठवड्यातून किमान एकदा तरी भोजन करावे, असे आवाहन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी केले. मध्य प्रदेशातील महाकौशल भागातील संघ स्वयंसेवकांच्या कुटुंबीयांपुढे सरसंघचालक भागवत यांनी भाषण केले. त्यावेळी उपस्थित असलेल्या काही जणांनी 'पीटीआय'ला भागवतांच्या भाषणाची माहिती दिली.संघ स्वयंसेवकांच्या कुटुंबीयांनी आपल्या परिसरातील सफाई कामगारांना किंवा समाजातील वंचित घटकातील कोणत्याही कुटुंबाला आपल्याकडे आमंत्रित करावे आणि आठवड्यातून



एकदा त्यांच्यासह भोजन घ्यावे, असे सरसंघचालक म्हणाले. स्वयंसेवकांनी चांगुलपणाचा प्रसार करावा, तसेच जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी कार्य करून आदर्श निर्माण करावा. सामाजिक सलोखा राखण्याबरोबरच सर्वांना समानतेने वागवा, असे आवाहनही भागवत यांनी केल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कुणाचीही जात विचारली जात नाही, किंबहुना प्रत्येकजण एकत्र भोजन घेतात आणि एकत्र कामही करतात. अशा प्रकारचे वातावरण तुमच्या प्रत्येक घरात तुम्ही तयार केले पाहिजे, असेही सरसंघचालकांनी संघ स्वयंसेवकांच्या कुटुंबीयांना सांगितले.

---

## राजीव गांधी हत्या प्रकरण : दोषींच्या सुटकेविरोधात केंद्र सरकारनंतर काँग्रेसकडूनही पुनर्विचार याचिका

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येप्रकरणातील सहा दोषींची सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने ११ नोव्हेंबर रोजी दिले होते. त्यात नलिनी श्रीहरन हीचाही समावेश होता. या निर्णयाविरोधात काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. दरम्यान, केंद्र सरकारनंतर आता काँग्रेस पक्षही या दोषींच्या सुटकेविरोधात पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याची माहिती काँग्रेस नेते अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली आहे. राजीव गांधी हत्या प्रकरणातील दोषींची सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. याप्रकरणी आम्ही पुनर्विचार याचिका दाखल करणार आहे. मात्र, ही याचिका केंद्र सरकारच्या याचिकेबरोबर करायची की वेगळी दाखल करायची याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, अशी माहिती अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली.



### यापूर्वी केंद्र सरकारकडून पुनर्विचार याचिका

**सर्वोच्च न्यायालयाने राजीव गांधी हत्या प्रकरणातील दोषींची सुटका करण्याचे निर्देश दिल्यानंतर या निर्णयाविरोधात १७ नोव्हेंबर रोजी केंद्र सरकारकडून पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. याप्रकरणी सरकार एक प्रमुख पक्षकार असून त्यांचे म्हणणे ऐकून न घेताच माजी पंतप्रधानांच्या मारेकऱ्यांना मुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले, असे या याचिकेत सांगण्यात आले होते.**

### सर्वोच्च न्यायालयाने दिले होते दोषींच्या सुटकेचे निर्देश

**राजीव गांधींच्या हत्येप्रकरणी दोन दशकांहून अधिक काळ जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या नलिनी श्रीहरन, आर. पी. रविचंद्रन, जयकुमार, संथन, मुरुगन आणि रॉबर्ट पायस यांची सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने ११ नोव्हेंबर रोजी दिले होते. "या सर्व दोषींनी २३ वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगवास भोगला आहे. त्यांची तुरुंगातील वागणूक समाधानकारक होती, त्यांनी पदवी संपादन केली आहे, पुस्तकेही लिहिली आहेत आणि समाजसेवेतही सहभाग घेतला", असे निरीक्षणही न्यायालयाने आदेशात नोंदवले होते. तसेच "पेरारिवलनच्या सुटकेचे निर्देश देताना न्यायालयाने जे निकष आणि बाबी विचारात घेतल्या होत्या, त्या सध्याच्या याचिकाकर्त्यांनाही लागू होत असल्याचे आम्हाला आढळले आहे. त्यामुळे या याचिकाकर्त्यांनी संबंधित गुन्ह्यासाठी पुरेशी शिक्षा आतापर्यंत भोगली आहे.**

# श्रेया घोषालचा आवाज गेला? पोस्टनं चाहत्यांना बसला धक्का

बॉलीवूडची प्रसिद्घ गायिका श्रेया घोषालची सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल झाली आणि चाहत्यांना मोठा धक्का बसल्याचे दिसून आले आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ आपल्या बहारदार गायनानं श्रेयानं चाहत्यांना जिंकून घेतले आहे. श्रेया ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. मात्र आता तिच्या त्या पोस्टनं लाखो चाहत्यांच्या काळजात धस्स झाले आहे. तिनचं केलेल्या खुलाशानंतर चाहत्यांनी तिच्यासाठी प्रार्थनाही केली आहे.

श्रेयानं लिहिलं आहे की, गेल्या रात्री माझा ओरलँडोमध्ये नाईट कॉन्सर्ट होता. त्यानंतर अचानक माझ्या आवाजात बिघाड झाला. मला त्रास होऊ लागला. माझा आवाज हा त्या कॉन्सर्टनंतर गेलाच होता. त्यामुळे मी खूप घाबरुन देखील गेले होते. काय करावे मला कळेना. अशावेळी माझे चाहते आणि डॉक्टर समीर भार्गव यांनी घेतलेली काळजी यासगळ्यांना मी धन्यवाद देते. श्रेयानं त्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, त्या कॉन्सर्टनंतर माझा आवाज हा खराब झाला आहे, ती पोस्ट वाचल्यानंतर नेटकऱ्यांनी तिच्यासाठी प्रार्थना केली आहे. सध्या श्रेयाची प्रकृती आणि तिचा आवाज ठीक असल्याचे म्हटले जात आहे. मात्र अचानक एखाद्या लाईव्ह कॉन्सर्टनंतर आवाज जाणे हे एखाद्या कलाकारासाठी धोकादायक असल्याचे दिसून आले आहे. त्यात श्रेयासारख्या गायकीच्या आवाजाला बसलेला धक्का हा चाहत्यांना आणखी काळजीत टाकणारा आहे.



# अपूर्वा पुन्हा लग्न करणार पण 'या' अटीवर..,

बिग बॉस मराठी सध्या रंजक वळणावर आहे. इथे कधी स्पर्धकांना आपण एकमेकांशी कचाकचा भांडताना पाहतोय तर कधी गळ्यात गळे घालून मैत्री एन्जॉय करताना पाहतोय. या घरात नेहमीच वाद होतात,राडे होतात असं नाही बरं का...इथे अनेकदा डायनिंग टेबलवर,लॉनमध्ये तर कधी अगदीच घराच्या एखाद्या कोपऱ्यात गप्पा मारत बसलेले सदस्य खूप काही बोलून जातात अन् रसिक प्रेक्षक त्याच्यात अलगद रमून जातो. आता अपूर्वाच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी कळतेय ...ती देखील तिच्या



लग्नाविषयीची. चला जाणून घेऊया सविस्तर. बिग बॉसच्या घरात अपुर्वा,अमृता आणि अक्षय तिघे गप्पा मारत बसले असताना नेमका विषय निघतो लग्नाचा. आता अक्षय आणि अमृताचं लग्न झालं नसलं तरी अपूर्वाचा घटस्फोट झालाय हे आता बऱ्यापैकी अनेकांना माहीत आहे. पण असं असताना लग्न या विषयावर अपूर्वानं बिनधास्त काही वक्तव्य त्या चर्चेत सामिल होत केली आहेत. सुरुवातीला तर अक्षयअपूर्वाला म्हणताना दिसतोय,' तुझं लग्नाचं वय निघून गेलंय तरी विचार करतेयस अजून ...',तेव्हा अपूर्वा पटकन म्हणते,'असं कुणी मिळालं नाही अजून',तेव्हा तिला मध्येच थांबवत अक्षय म्हणतो,' उगाच काहीही ...',मग अपूर्वाही आपल्याला कसा मुलगा हवाय हे सांगताना आपली एक अट बोलून दाखवते.

# उर्वशीने ओतलं पुन्हा एकदा आगीत तेल

बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला आणि टीम इंडियाचा विकेटकीपर बल्लेबाज ऋषभ पंत याच्यातील वाद तर आता सर्वश्रूत झाला आहे. T20 विश्वचषकानंतर तर दोघांच प्रकरणल चांगलच गाजलं. उर्वशीने सोशल मिडियावर धडाधड पोस्ट टाकल्या आणि चर्चांना उधाण आलं होतं .

दुसरीकडे सामन्या दरम्यानं ऋषभलाही उर्वशीच्या नावाने चिडवण्यात आलं होतं. त्यानंतर उर्वशीने RP संदर्भात एक फोटो टाकत तो तिचा मित्र असल्याचं सांगितलं. मात्र आता परत तिने ऋषभ पंतशी संबधित एक व्हिडिओ टाकलाय. त्यामूळे पुन्हा तिच्या आणि ऋषभबद्दल नात्यावर चर्चा सुरु झाली आहे.

दरम्यान, उर्वशी रौतेलाने स्वतः ऋषभ पंतशी संबंधित एक स्टोरी इस्टांग्रामवर शेअर केली आहे. उर्वशी रौतेलाने शेअर केलेल्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये पत्रकाराने ऋषभ पंतशी संबंधित प्रश्न विचारला आणि तिने यावर उघडपणे उत्तरही दिले आहे. पत्रकाराने उर्वशी रौतेलाला प्रश्न विचारला, 'तुम्ही तर गुगली टाकली आहे. आरपी म्हणजे ऋषभ पंत असं आम्हाला वाटायचं, पण आता कोणी दुसराच आरपी निघाला आहे, यावर तुम्हाला काय म्हणायचं आहे?' या प्रश्नाला उत्तर देताना उर्वशी म्हणाली, 'आरपी माझा कोॲक्टर आ हे . मी ज्यांच्यासोबत काम करत आहे. तुम्ही त्याला कोणीही म्हणा, तो माझा सहकलाकार आहे. उर्वशीचे म्हणणं ऐकून पत्रकार पुढचा प्रश्न विचारतो, 'आरपी हॉटेलच्या बाहेर बराच वेळ तुझी वाट पाहणारा कोण होता? तो तुमचा सहकारीच होता का?' या प्रश्नाचे उत्तर देताना उर्वशी आरामात म्हणते, 'मी येथे फक्त माझ्या आगामी चित्रपटाबद्दल आणि आगामी प्रोजेक्टबद्दल बोलण्यासाठी आले आहे'. मागील काही घटनांवरुन उर्वशी आणि ऋषभ पंत यांच्यात शीतयुद्धासारखी परिस्थीती निर्माण झाली होती. जेव्हा अभिनेत्रीने नाव न घेता सांगितले की श्री आरपी तिला भेटण्यासाठी खूप उत्सुक होता आणि तासनतास हॉटेलच्या लॉबीमध्ये बसून तिची वाट पाहत होता. यानंतर उर्वशी आशिया कप मध्ये भारत-पाकिस्तान सामन्यादरम्यानही स्टेडियममध्ये दिसली होती. त्यानंतर तिचा एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामध्ये ती पंतची माफी मागताना दिसली. मात्र नंतर त्यांनी ते नाकारले



# निया शर्माचा खेळ संपला!

लोकप्रिय सेलिब्रिटी डान्स रिॲलिटी शो 'झलक दिखला जा 10' आता शेवटच्या टप्प्यात आला आहे. शो जिंकण्यासाठी सर्वच स्पर्धक अतोनात मेहनत घेत आहेत. स्टंट करण्यापासून ते जॉड्रॉपिंग डान्स मूव्हपर्यंत, शक्य तितकं स्पर्धक आपल्या परफॉर्मन्सने प्रेक्षकांच आणि परिक्षकांचं मन जिंकण्याचं प्रयत्न करत आहे. मात्र या शोमध्येही मोठा ट्विस्ट आला आहे. टेलिव्हिजनच्या लोकप्रिय अभिनेत्री निया शर्मा आणि नीति टेलर झलक दिखलाजा सीझन 10 च्या सेमीफायनलमध्ये बाहेर पडल्या आहेत

झलक दिखला जा च्या उपांत्य फेरीतून निया आणि निती टेलर या दोघं तगड्या स्पर्धकांना बाहेर काढल्याने चाहत्यांना धक्का बसला आहे. नियाला प्रेक्षक या शोचे विजेते म्हणून पाहत असतांना त्यांची मोठी निराशा झाली आहे. खरं तर शो मध्ये एक मोठा ट्विस्ट दिसला ज्यात निशांत भट्ट आणि फैजू यांना समान मतं मिळाली होती. अशा परिस्थितीत शोच्या नियमांच्या आधारावर, परिक्षकांच्या निर्णयावरुन नीती टेलरला बाहेर जावे लागले.

परिक्षकांच्या या निर्णयानंतर नीतीच्या हकालपट्टीने प्रेक्षक आश्चर्यचकित झाले असतांनाच नियालाही बेदखल करण्यात आल्याने धक्का बसला होता. दोघांचीही सोशल मीडियावर प्रचंड फॅन फॉलोइंग आहे आणि त्या दोन्ही शोच्या उत्तम



स्पर्धकांपैकी एक होत्या. या एलिमिनेशनमुळे करण जोहर, माधुरी दीक्षित आणि नोरा फतेही यांनाही दुख: झालं आहे. बाहेर निघतांना नीती म्हणाली की, नियाला या शोची विजेती म्हणून पाहिलं जात होतं. मला याची अपेक्षा नव्हती, पण मी या शोमधील माझ्या प्रवासाने खूप आनंदी आहे. खूप एन्जॉय केले. माझ्या नृत्यांत बरीच सुधारणा झाली आहे. यासोबतच तिने तिच्या डान्सिंग पार्टनर आणि कोरिओग्राफर आकाश थापा याचंही आभार मानले.

# विश्वचषकाची ऐतिहासिक सुरुवात

## सलामीच्या लढतीत इक्वेडोरची यजमान कतारवर सरशी

**दोहा ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

आघाडीपटू एनर व्हॅलेंसियाने झळकावलेल्या दोन गोलच्या बळावर विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या सलामीच्या लढतीत इक्वेडोरने रविवारी यजमान कतारवर २-० असा विजय इक्वेडोरने रविवारी यजमान कतारवर २-० असा विजय मिळवला. विश्वचषक स्पर्धेत यजमान संघ उद्घाटनीय सामन्यात पराभूत होण्याची ही पहिलीच वेळ होती.

इक्वेडोरने सामन्याच्या सुरुवातीपासूनच नियंत्रण मिळवत कतारच्या बचाव फळीवर दडपण आणले. तिसऱ्या मिनिटाला व्हॅलेंसियाने गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र, पंचांनी 'ऑफसाइड'चा इशारा केल्याने तो गोल अवैध ठरवण्यात आला. यानंतरही इक्वेडोरच्या खेळाडूंचे कतारवर आक्रमण सुरू होते. १६व्या मिनिटाला पेनल्टीच्या साहाय्याने व्हॅलेंसियाने गोल झळकावत इक्वेडोरला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर व्हॅलेंसियाने (३१व्या मि.) पुन्हा एकदा पुढाकार घेत हेडरच्या मदतीने अप्रतिम गोल करत इक्वेडोरला २-० अशा मजबूत स्थितीत पोहोचवले.



# इराणविरुद्ध इंग्लंडची कसोटी!

## आज दोन्ही संघांची सलामीची लढत; केनवर नजर

**दोहा।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



पाच दशकांहूनही अधिक काळापासूनचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यास उत्सुक असलेल्या इंग्लंडच्या संघाचे सोमवारी विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत इराणविरुद्ध दमदार सलामीचे लक्ष्य असेल. या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार आणि आघाडीपटू हॅरी केनच्या कामगिरीवर चाहत्यांचे लक्ष असेल.इंग्लंड आणि इराण या संघातील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असेल. इंग्लंडचा संघ कागदावर इराणपेक्षा बलाढ्य दिसत असला, तरी ब-गटातील या सामन्यात इंग्लंडची कसोटी लागणे अपेक्षित आहे. गॅरेथ साऊथगेट यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या इंग्लंडला गेल्या सहा सामन्यांत विजय मिळवता आलेला नाही. दुसरीकडे, इराणने विश्वचषकापूर्वीच्या २२ पैकी केवळ तीन सामन्यांत पराभव पत्करला आहे. त्यामुळे इराणचा संघ लयीत असून या सामन्यात विजय मिळवण्यासाठी इंग्लंडला सर्वोत्तम खेळ करावा लागेल. इंग्लंडने गेल्या विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठली होती, पण त्यांना क्रोएशियाकडून पराभव पत्करावा लागला होता. त्या विश्वचषकात हॅरी केनने (६ गोल) सर्वाधिक गोल केले होते. यंदाही केनवरच इंग्लंडच्या संघाची भिस्त असेल. तसेच इंग्लंडच्या संघात डेक्लन राईस आणि ज्यूड बेलिंगहॅम यांसारखे प्रतिभावान मध्यरक्षक, तर रहीम स्टर्लिंगसारखा अनुभवी आघाडीपटू आहे. त्यांच्याकडूनही संघाला चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल. इंग्लंडला बचावाची चिंता आहे.

दुसरीकडे, इराणचा संघ गोलसाठी मेहदी तारेमी आणि अलिरेझा जहानबख्श यांच्यावर अवलंबून असेल. तारेमीने आतापर्यंत ६० आंतरराष्ट्रीय सामन्यांत २८ गोल केले आहेत. त्याच्यापासून इंग्लंडला सावध राहावे लागेल.

**इराण :** अलीरेझा बेरनवंद; सदेघ मोहरमी, होसेन कनानीझादेगन, माजिद होसेनी, एहसान हजसाफी; अहमद नौरोल्लाही, सइद इझातोलाही, ओमिद इब्राहिमी; अलिरेझा जहानबख्श, करीम अन्सारीफार्द, मेहदी तारेमी

**इंग्लंड :** अलीरेझा बेरनवंद; सदेघ मोहरमी, होसेन कनानीझादेगन, माजिद होसेनी, एहसान हजसाफी; अहमद नौरोल्लाही, सइद इझातोलाही, ओमिद इब्राहिमी; अलिरेझा जहानबख्श, करीम अन्सारीफार्द, मेहदी तारेमी

इराणचा संघ यंदा सहाव्यांदा आणि सलग तिसऱ्यांदा 'फिफा' विश्वचषकात खेळणार आहे. त्यांनी १९७८ मध्ये अर्जेंटिना येथे विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत पदार्पण केले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही